ePaper


**आज मंत्रीमंडळ विस्तार होणार? अजित पवारांच्या दिल्ली दौऱ्यावरून चर्चेला उधाण**




वर्ष - 7 । अंक -72 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । गुरुवार , दिनांक 13 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- शासन आपल्या दारी कार्यक्रम रद्द
- ६ हजार ग्राहकांचे 'चेक बाऊंस'!
- खातेवाटपाचा गुंता सुटेना!

# बनसोडे विरुद्ध गोरखे रस्सीखेच!

## » भाजपा-राष्ट्रवादीत छुपा संघर्ष : उमेदवारी अन् महामंडळासाठी 'साखरपेरणी'

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे प्रमुख अमित गोरखे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची त्यांच्या निवासस्थानी जात भेट घेतली. पिंपरीतून निवडणूक लढविण्यासाठी तीव्र इच्छुक असलेल्या गोरखे यांनी अजितदादांची भेट घेतल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.**



दरम्यान, गोरखे यांच्या भेटीमुळे महामंडळ मिळवण्यासाठी की २०२४ मध्ये महायुतीची उमेदवारी मिळवण्यासाइी ही 'साखरपेरणी' आहे का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. अजित पवार आपल्या समर्थक आमदारांसह शिंदे-फडणवीस सरकामध्ये सहभागी झाले. त्यामुळे शहरातील राजकारण ढवळून निघाले आहे. राजकीय परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. पिंपरी मतदार संघात विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांचे अजित पवार यांच्या भाजपा युतीमुळे पारडे जड झाले आहे.

दुसरीकडे, याच मतदार संघात भाजपाकडून विधानसभा निवडणुकीसाठी तीव्र इच्छुक असलेल्या अमित गोरखे यांनी थेट अजित पवार यांची भेट घेतल्यामुळे राष्ट्रवादीतील बनसोडे समर्थकांची अस्वस्थता वाढली आहे. कारण, अमित गोरखे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर समर्थक आहेत. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्षपदही गोरखे यांनी भूषविले आहे. त्यामुळे गोरखेंची भेट महामंडळासाठी की विधानसभा उमेदवारीची 'फिल्डिंग' लावण्यासाठी होती, अशी चर्चा जोर धरु लागली आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती झाल्याबद्दल अजित पवार यांचे अभिनंदन केले. शहरातील काही प्रलंबित प्रश्नांबाबत त्यांना निवेदन देवून चर्चा केली. या भेटीकडे राजकीय चष्म्यातुन पाहू नये, असे गोरखे म्हणाले आहेत. तसेच, राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. अजित पवार यांच्या बंडात कायम सोबत असलेले बनसोडे विधानसभा निवडणुकीत उमेदवारीचे दावेदार राहणार आहेत. कारण, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही बनसोडे यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत.

### विधानसभेच्या जागेवरुन रस्सीखेच?

भाजपाने त्यांची पिंपरी विधानसभेच्या प्रमुखपदी नियुक्तीही केली आहे. गोरखे यांच्याकडे पिंपरीचे भाजपचे उमेदवार म्हणून पाहिले जात आहे. २०१९ च्या निवडणुकीवेळी गोरखे तीव्र इच्छुक होते. पण, भाजप-शिवसेना युतीमध्ये जागा शिवसेनेला गेल्याने गोरखे यांना थांबावे लागले होते. महाविकास आघाडी झाल्यानंतर गोरखे यांनी पुन्हा पिंपरीतून जोरदार तयारी सुरु केली होती. पण, अजित पवारांचा गट सरकारसोबत आला. त्यामुळे भाजप आणि पवार गटात पिंपरी विधानसभेच्या जागेवरुन रस्सीखेच होवू शकते. कारण, जागा वाटप फॉर्म्यूलानुसार, पिंपरीची जागा विद्यमान आमदार अण्णा बनसोडे अर्थात राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे राहीली, तर महामंडळासाठी 'क्लेम' कायम राहील, असा पवित्रा गोरखे यांच्याकडून घेतल्याचे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.




### सुलक्षणा शिलवंत यांचा 'सावध पवित्रा'

**»दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवार यांच्या बंडानंतर माजी नगरसेविकास सुलक्षणा शिलवंत यांनी 'सावध पवित्रा' घेतला आहे. शरद पवार की अजित पवार गट याबद्दल कोणतीही जाहीर भूमिका शिलवंत यांनी घेतलेली नाही. २०१९ मध्ये शिलवंत यांना राष्ट्रवादीची उमेदवारी जाहीर झाली होती. मात्र, ऐनवेळी अजित पवार यांनी अण्णा बनसोडे यांचा अर्ज कायम ठेवला. त्यामुळे शिलवंत यांना माघार घ्यावी लागली. आता २०२४ मध्ये शिलवंत विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार हे निश्चित आहे. माजी महापौर योगेश बहल आणि शिलवंत यांच्यातील संघर्ष संपुष्टात आल्याची चिन्हे आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी आणि भाजपामधील छुप्या संघर्षात सुलक्षणा शिलवंत 'जायंट किलर' होण्याची शक्यता आहे.**

# वाराणसी आता राबवणार 'पिंपरी-चिंचवड मॉडेल'!

## » आयुक्त सिपू गिरी यांची भूमिका : महापालिका प्रकल्पांचे केले तोंडभरुन कौतूक

। पिंपरी । महाईन्यूज

**वाराणसी महानगरपालिका आयुक्त सिपू गिरी, सनदी अधिकारी जयदेव चंद्रशेखर यांनी बुधवारी पिंपरी-चिंचवड महापालिका आणि स्मार्ट सिटीच्या माध्यमातून उभारण्यात येत असलेल्या विविध विकास प्रकल्पांना प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली.**

आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उद्यान विभागाचे प्रमुख रविकिरण घोडके आदी उपस्थित होते. प्रसंगी, सादरीकरणाद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नागरिकांना देण्यात येणा-या आरोग्य सेवा, स्वच्छता, ई-क्लास



रूम प्रकल्प, पाणी पुरवठा, स्वच्छ सर्वेक्षण, रस्ते विकास, कर आकरणी, उद्यान, पर्यावरण विभागामार्फत सूरू असलेल्या उपाययोजना तसेच स्मार्ट सिटीच्या प्रकल्पांविषयी चर्चा करण्यात आली. सुरुवातीला गिरी यांनी मनपा भवनाची पाहणी करून विभागानुसार माहिती जाणून घेतली. तसेच, स्मार्ट सिटी कार्यालय येथे विविध सेवांच्या डिजिटलायझेशनबाबत महापालिका व स्मार्ट सिटी उपक्रमांचे सादरीकरण, तसेच निगडीतील इंटीग्रेटेड कंमाड कंट्रोल सेंटर येथे भेट देवून कचरा संकलन, पाणी पुरवठा, सीसीटीव्ही कॅमेरे, वाहतुक व्यवस्था याबाबत प्रत्यक्ष कार्यपध्दतीची माहिती घेतली. तसेच, अटल बिहारी वाजपेयी उद्यानात भेट देवून तेथील कामाची पाहणी केली.

> “ पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी मार्फत जे लोकोभिमुख प्रकल्प राबविले जात आहेत. ते नक्कीच शहराच्या विकासात लाभदायी ठरणारे असून वाराणसी महानगरातसुध्दा असे प्रकल्प राबविण्यात भर देणार असून डिजीटल भारताच्या विकासाला यातून चालना मिळणार आहे.
>
> **-- सिपू गिरी,** आयुक्त, वाराणसी महापालिका.

# शासन आपल्या दारी कार्यक्रम रद्द

## » जेजुरीत गुरुवारी होणारा कार्यक्रम तिसऱ्यांदा पुढे ढकलला

### » लाभार्थ्यांसह उत्साही कार्यकर्त्यांची घोर निराशा

। पुणे/ जेजुरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडेरायाच्या जेजुरी नगरीमध्ये गुरुवारी (दि १३ ) शासन आपल्या दारी हा कार्यक्रम होणार होता परंतु हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. तशा आशयाचे पत्र मंत्रालयातून प्रशासनाला आले आहे.या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार जेजुरीत येणार होते,कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वागताचे बॅनर लावण्यात आले होते. मात्र कार्यक्रम रद्द झाल्याने लाभार्थ्यांसह उत्साही कार्यकर्त्यांची घोर निराशा झाली.हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.**




जेजुरीमध्ये शासन आपल्या दारी कार्यक्रमाबरोबरच खंडोबा गडाच्या विकास आराखड्यातील कामे सुरू करण्याचे उदघाटन होणार होते, रोजगार मेळावा ही भरवला जाणार होता,गेले आठ दिवस होळकर तलावाजवळ असलेल्या पालखी मैदानात मेळाव्याची जय्यत तयारी सुरू होती यासाठी भव्य स्वरूपात शेड उभी करून सर्व व्यवस्था करण्यात आल्या होत्या मात्र कार्यक्रम रद्द झाल्याची बातमी आल्याने जेजुरीकरांची निराशा झाली. यापूर्वी हा कार्यक्रम ३ जुलैला होणार होता मात्र त्यानंतर ८ जुलै ही तारीख जिल्हा प्रशासनाकडून समजली होती ती रद्द होऊन १३ जुलै तारीख नक्की करण्यात आली होती.

पावसाळ्याचे दिवस असल्याने प्रशासनाने भव्य मंडप उभारला होता किमान २५ हजार लाभार्थी या कार्यक्रमासाठी येणार होते मात्र आता हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे.

### मंत्रिमंडळ विस्तारामुळे कार्यक्रम रद्द ?

**» मंत्रिमंडळाचा विस्तार गुरुवारी संध्याकाळपर्यंत होऊ शकतो अशी दाट शक्यता आहे. कारण अजित पवार हे आज दिल्लीला रवाना झाले आहेत. गुरुवारी विस्तार होणार का? कुणाला काय मिळणार याची चर्चा सुरु असतानाच अचानक शासन आपल्या दारी हा जेजुरीतला कार्यक्रम तिसऱ्यांदा रद्द करण्यात आला आहे. मंत्रिमंडळ विस्तारामुळेच हा कार्यक्रम रद्द करण्यात आला का? याचीही चर्चा होते आहे.**

---

# ६ हजार ग्राहकांचे 'चेक बाऊंस'

## » 'ऑनलाइन'वीजबिल भरण्याचे आवाहन

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महावितरणच्या पुणे परिमंडलामध्ये लघुदाब वर्गवारीतील दरमहा ६ हजार ५०० ग्राहकांनी वीजबिल भरण्यासाठी दिलेले धनादेश अनादरीत (चेक बाऊंस) होत असल्याचे दिसून येत आहेया सर्व ग्राहकांना दरमहा सुमारे ४८ लाख ७५ हजारांच्या बँक ॲडमिनिस्ट्रेशन चार्जेसचा तसेच १.२५ टक्के विलंब आकाराचा नाहक दंड सोसावा लागत आहे. .**



त्यामुळे ग्राहकांनी वीजबिलांचा धनादेशाऐवजी 'ऑनलाइन' किंवा इलेक्ट्रॉनिक क्लिअरन्स सिस्टीमद्वारे (ईसीएस) भरणा करावा असे आवाहन महावितरणने केले आहे. पुणे परिमंडल अंतर्गत सुमारे ९८ हजार ५०० ते ९९ हजार वीजग्राहक दरमहा धनादेशाद्वारे सुमारे ११९ कोटी ५० लाख रुपयांच्या वीजबिल भरणा करीत आहे. यातील सुमारे ६ हजार ते ६ हजार ५०० ग्राहकांनी दिलेले साधारणतः ४ कोटी ६५ लाख रुपयांचे धनादेश विविध कारणांमुळे अनादरीत होत आहे.

यामध्ये पुणे शहरातील ४ हजार ४५०, पिंपरी चिंचवड- १०५० आणि मुळशी, वेल्हे, हवेली, आंबेगाव, जुन्नर, खेड व मावळ तालुक्यांतील सुमारे एक हजार ग्राहकांचे धनादेश दरमहा अनादरीत होत असल्याचे दिसून येत आहे. अनादरीत धनादेशासाठी चुकीची तारीख, खाडाखोड, चुकीची स्वाक्षरी, चुकीचे नाव, संबंधीत खात्यात रक्कम नसणे आदी कारणे दिसून येत आहेत. अनादरीत धनादेशाद्वारे अनेक वीजबिलांचा भरणा केला असल्यास प्रत्येक वीजबिलासाठी दंडात्मक रक्कम व विलंब आकार लावण्यात येत आहे. त्यानुसार प्रत्येक वीजबिलासाठी ७५०/- रुपये बँक ॲडमिनिस्ट्रेशन चार्जेस व १.२५ टक्के विलंब आकार पुढील महिन्याच्या वीजबिलात इतर आकार म्हणून समाविष्ट करण्यात येत आहे. याउलट पुणे परिमंडलामध्ये राज्यात सर्वाधिक दरमहा २० लाख लघुदाब ग्राहकांकडून तब्बल ६०० कोटी रुपयांचा वीजबिल भरणा 'ऑनलाइन'द्वारे सोयीने व सुरक्षितपणे केला जात आहे. तसेच थेट बँकेद्वारे दरमहा वीजबिल भरणा करण्यासाठी 'ईसीएस'ची सोय उपलब्ध आहे. पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी सांगितले की, लघुदाब वर्गवारीतील औद्योगिक, वाणिज्यिक व घरगुती किंवा सोसायट्यांच्या वीजग्राहकांना 'आरटीजीएस' किंवा 'एनईएफटी'द्वारे वीजबिल भरण्याची मर्यादा यापूर्वी १० हजार रुपयांपेक्षा अधिक होती. ही मर्यादा आता किमान ५ हजार रुपये करण्यात आली आहे.

त्यानुसार या ग्राहकांच्या ५ हजारांपेक्षा अधिक रुपयांच्या वीजबिलांवर महावितरणच्या बँक खात्याचा तपशील देखील देण्यात येत आहे. घरबसल्या एका क्लिकवर 'ऑनलाइन' वीजबिल भरण्यासाठी ५०० रुपयांच्या मर्यादित प्रत्येक महिन्याच्या वीजबिलामध्ये ०.२५ टक्के तर प्रॉम्प्ट पेमेन्ट केल्यास एक टक्का असे एकूण १.२५ टक्के सूट वीजग्राहकांना देण्यात येत आहे.

# वाळू उपाशासाठी २६ ठिकाणे निश्चित

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

वाळू उपसा करण्यासाठी जिल्हा खनिकर्म विभागाने २६ ठिकाणे निश्चित केली आहेत. त्याकरिता ई-निविदा मागविल्या असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या ठिकाणांहून ६०० रुपये ब्रास या सरकारी दराने नागरिकांना वाळू उपलब्ध करून दिली जाणार आहे. राज्य सरकारने नवीन वाळू धोरण आणले आहे. नागरिकांना स्वस्त दराने वाळू मिळण्यासाठी तसेच अनधिकृत वाळू उत्खननाला आळा घालण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर एक वर्षासाठी सर्व नागरिकांना प्रति ब्रास ६०० रुपये वाळू उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने जलसंपदा विभागाकडून जिल्ह्यात वाळू उपसा करण्याच्या ठिकाणांची माहिती मागविली होती. त्यांनी दिलेल्या माहितीवरून प्रशासनाने जिल्ह्यातील दौंड, हवेली, बारामती, जुन्नर, पुरंदर, आंबेगाव, शिरूर आणि खेड तालुक्यातून जाणाऱ्या भीमा, मुळा-मुठा, नीरा, घोड, कऱ्हा, मीना नदीपात्रातून गाळमिश्रित वाळू उपसा आणि आगार करण्याची ठिकाण निश्चित करण्यात आली आहेत.दरम्यान, बारामती तालुक्यात नीरा नदीवर मुरूम, वाणेवाडी येथे वाळू उपसा करण्याचे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे. जुन्नरमधील मीना नदीवरील निरगुडे आणि बेलसर, पुरंदर तालुक्यातील कऱ्हा नदीवर कुंभारवळण, एखतपूर, खानवडी, नाझरे सुपे, नाझरे क.प., जवळार्जुन आणि पांडेश्वर येथे वाळू आगार केले जाणार आहे. आंबेगाव तालुक्यातील घोड नदीवर देवगाव, लाखणगाव, काठापूर बु., पारगाव तर्फे अवसरी बु. चिचोडी, तर भीमा नदीवरील मांडगाव फराटा आणि सादलगाव, खेडमधील भीमा नदीवर पाडळी येथे वाळू उपसा आणि आगार केले जाणार आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. जिल्ह्यातील २६ वाळू आगार निश्चित करण्यात आले आहेत. त्याकरिता ई- निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# ‘कोविड योद्धा’ महिलांना मिळाली ‘नवी दिशा’!

## » महापालिका प्रशासनाचा स्तुत्य उपक्रम : निराधार महिलांच्या हाताला रोजगार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोविड महामारीमध्ये पती गमावलेल्या विधुर महिलांना पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विधायक पुढाकारामुळे ‘नवी दिशा’ मिळाली आहे. या महिलांच्या हाताला रोजगार मिळाला असून, महिला सक्षमीकरणासह आर्थिक स्वयंपूर्णतेची संधी निर्माण झाली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका समाज विकास विभागामार्फत ‘नवी दिशा’ हा उपक्रम दोन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आला. गरजू महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी त्यांना सन्मानाने रोजगार उपलब्ध करून देण्याचा महापालिका प्रयत्न करत आहे.

कोविड काळात पतीचे निधन झाल्यामुळे शहरातील ‘त्या’ महिलांचा आधार हरपला होता. त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे प्रशासनाने अशा महिलांसाठी मदत करण्यासाठी पुढाकार घेतला. कोरोना काळात ज्या महिलांचे पती कोरोना संसर्गाने बाधित होऊन कोरोना आजाराने मृत्यू पावले आहेत. त्यांना आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने 25 हजार रुपये इतके अर्थसाहाय्य दिले जात आहे. तसेच, रोजगाराच्या संधीही उपलब्ध केल्या जात आहेत. ग-क्षेत्रीय कायालय येथे कोविड योद्धा महिला बचत गटाच्या माध्यमातून शिलाई युनिट कार्यरत आहे. बचतगटाच्या अध्यक्षा सुवर्णा भालेराव आहेत.

त्यांच्या माध्यमातून २० महिलांना रोजगारा मिळाला असून, कापडी पिशव्या बनवण्यात येत आहेत. प्लॅस्टिक मुक्त शहर या संकल्पनेतून आगामी काळात कापडी पिशव्या बनवण्याचे काम वाढणार असून, त्यामुळे संबंधित महिलांना आर्थिक फायदा होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.



> **“ पिंपरी-चिंचवड शहराला स्वच्छ आणि सुंदर शहर करत असताना प्लास्टिक पिशवीच्या वापरावर बंदी असून यासाठी पर्याय देणे गरजेचे आहे. या अनुषंगाने नागरिकांनी कापडी पिशवीचा अधिकाधिक वापर करावा यासाठी महापालिका स्तरावर जागृती करण्यात येत आहे. शिवाय महापालिकेच्या वतीने विविध ठिकाणी कापडी पिशव्यांचे वाटपदेखील करण्यात आले. नागरिकांना सहजतेने कापडी पिशव्यांची उपलब्धता व्हावी यासाठी त्या तयार करण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने ‘नवी दिशा शिलाई युनिट’ स्थापन करण्यात आले आहे. हा लोकाभिमुख उपक्रम असून यातून रोजगार निर्मिती व्हावी तसेच नागरिकांना कापडी पिशव्या सहजतेने आणि किफायतशीर दरांत उपलब्ध व्हाव्यात हा उद्देश आहे. महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून आषाढी वारी पालखी सोहळ्यात कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले होते. त्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.**
>
> **- अजय चारठाणकर, उपायुक्त.**

# ‘प्रधानमंत्री आवास’साठी आयुक्त ‘ऑनफिल्ड’

## » चऱ्होली, बोऱ्हाडेवाडी येथील प्रकल्पाची केली पाहणी

### » आमदार महेश लांडगे यांच्या बैठकीनंतर कामकाजाला ‘गती’

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांना निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाने ‘कालबद्ध कार्यक्रम’ हाती घेतला असून, त्याआधारे कामाला गती देण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी ‘ऑनफिल्ड’ पाहणी केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना निर्धारित वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.**



महापालिका प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ‘प्रधानमंत्री आवास योजना’ अंतर्गत चऱ्होली आणि बोऱ्हाडेवाडी येथे सुरू असलेल्या प्रकल्पांतील लाभार्थींना सदनिकांचे वाटप झालेले नाही. या पार्श्वभूमीवर भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची महापालिका भवनात बैठक घेतली होती.

त्यावेळी इमारतींचे काम पूर्ण झालेल्या सदनिकांचा ताबा देण्याबाबत तारखाही जाहीर केल्या होत्या. नियोजनाप्रमाणे कामाची पाहणी करण्याबाबत आयुक्त स्वत: दौरा करतील, असे निश्चित केले होते. त्यानुसार, मंगळवारी महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह शहर अभियंता रामदास तांबे, सहायक आयुक्त अण्णा बोदाडे यांच्यासह आमदार लांडगे यांचे स्वीय सहायक अनिकेत गायकवाड व स्थानिक कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप म्हणाले की, लाभार्थींना सोबत घेवून आयुक्तांनी प्रत्यक्ष सदनिकांची पाहणी केली. लाभार्थींना ‘टाईमलाईन’मध्ये सदनिकांचा ताबा देण्यात येणार आहे. ताबा दिल्यानंतर सोसायटी स्थापन करुन हस्तांतरण करण्यात येईल. त्यानंतर सदनिकाधारकांनी सोसायटीच्या पायाभूत सोयी-सुविधांबाबत सक्षमपणे निर्णय घ्यायचे आहेत, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी लाभार्थींना दिल्या आहेत.

### असा मिळणार सदनिकांचा ताबा

**» बोऱ्हाडेवाडी प्रकल्पातील लाभार्थींना दि. 31 जुलै 2023 रोजी काम पूर्ण करुन घरे ताब्यात देण्यात येणार आहेत. चऱ्होली प्रकल्पातील 4 इमारतीचे काम लवकर पूर्ण करून दि. 31 ऑगस्ट 2023 रोजी काम पूर्ण करुन लाभार्थ्यांना घरे ताब्यात देण्यात येणार आहे. तसेच, इमारत क्रमांक 2 आणि 3 दि. 31 ऑक्टोबर 2023 पर्यंत काम पूर्ण करुन ताबा देणे. इमारत क्रमांक 4 इमारतीचा 31डिसेंबर 2023 रोजी ताबा देण्यात येणार आहे. त्या अनुशंगाने प्रशासनाने कार्यवाहीला गती दिली आहे.**

> “ गेल्या आठवड्यात महापालिका भवनात झालेल्या बैठकीनुसार, लाभार्थींना निर्धारित वेळेत सदनिकांचा ताबा मिळावा. या करिता कालबद्ध कार्यक्रम निश्चित केला आहे. त्यानुसार निर्धारित तारखेला संबंधित लाभार्थींना सदनिकांचा ताबा मिळावा, अशी अपेक्षा आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि प्रशासनाने याकामी सकारात्मक भूमिकेतून कार्यवाही सुरू केली आहे. यातून ‘प्रधानमंत्री आवास’च्या लाभार्थींना निश्चितपणे दिलासा मिळेल.
>
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# लवकरच दुचाकी वाहनांसाठी ‘केवाय’ ही नवीन मालिका सुरु

। पिंपरी । महाईन्यूज ।



पिंपरी चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी ‘केवाय’ ही नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक तीनपट शुल्क भरून चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांक दुचाकींसाठी ठेवण्याबाबत आगाऊ अर्ज स्वीकारण्याची व लिलाव कार्यपद्धतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

नव्याने सुरु होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित तीनपट शुल्क भरून हवे असतील अशा चारचाकी वाहन मालकांनी १३ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा. दुचाकी मालिकेतील उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक दुचाकी वाहनांसाठी आरक्षित करण्यासाठी १४ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वा. विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा.

अर्ज कार्यालयाच्या नवीन वाहन नोंदणी विभागात धनाकर्ष (डीडी), पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधारकार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी ‘डी.वाय.आर.टी.ओ., पिंपरी चिंचवड’ यांच्या नावे राष्ट्रीयकृत, अनूसचित बँकेचा पुणे येथील असावा. अर्जदाराने ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत फोटो ओळखपत्र तसेच पत्त्याच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, दूरध्वनी देयक आदींची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

चारचाकी वाहनांसाठी क्रमांकांची यादी १४ जुलै रोजी सकाळी कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास १४ जुलै रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संबंधीत अर्जदारांसमोर लिफाफे उघडून विनिर्दीष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे. दुचाकीची यादी १७ जुलै रोजी कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. दुचाकीसाठी अर्जदारांना लिलावाकरीता जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास १७ जुलै रोजी दुपारी २.३० पर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा.




# पक्षांतर बंदी कायद्याची फेररचना हवी

**राजकारणातील संधिसाधूपणातून जे पक्षांतर होत असते त्याला पायबंद घालण्यासाठी राजीव गांधींच्या काळात पक्षांतर बंदी कायदा करण्यात आला होता. त्यानंतरच्या काळातही त्यात अनेक सुधारणा करून हा कायदा प्रभावी करण्यात आला होता. ज्याला पक्षांतर करायचे आहे त्याने सभागृहातील सदस्यत्वाचा राजीनामा देऊन खुशाल पक्षांतर करावे आणि निवडणूक लढवावी, अशी महत्त्वाची तरतूद यात होती.**




अन्यथा पक्षांतर करणाऱ्याला अपात्र ठरवले जायचे. पण या कायद्यात नव्याने पळवाटा तयार करून, त्याचा गैरवापर करून आजही घाऊक प्रमाणात पक्षांतर सुरू आहे. महाराष्ट्रात अलीकडच्या काळात घडलेली प्रकरणे पाहिल्यानंतर तर सध्याचा पक्षांतर बंदी कायदा निरूपयोगी आणि पूर्ण कुचकामी ठरत असल्याचेच दिसून आले आहे. महाराष्ट्रातील फुटिरांनी या कायद्यातून पळवाट शोधण्यासाठी आम्ही पक्षांतर केलेले नाही तर आम्हीच मूळ पक्ष आहोत' अशी भूमिका घेऊन पक्षांतर केले आहे व आपली ही कृती पक्षांतरबंदी कायद्यानुसार कशी वैध आहे हेच पटवून देण्याचा प्रयत्न या गटांकडून झाला आहे. शिवसेनेच्या बाबतीत जे झाले तेच आता राष्ट्रवादीच्याही बाबतीत झाले आहे. शिंदे गटाने आम्हीच मूळ शिवसेना आहोत असा दावा करताना बाळासाहेब ठाकरेंच्या वारशावर आणि त्यांच्या विचारांवर दावा सांगितला होता. तीच वाट अजित पवारांनी धरली आहे. खुद्द शरद पवार हयात असताना आणि शरद पवारांचा स्वतंत्र गट अस्तित्वात असतानाही अजित पवारांच्या गटाने आपल्या व्यासपीठावर शरद पवारांच्याच फोटोंचा वापर चालवला आहे. शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे दिवंगत झाल्यानंतर त्यांच्या विचारांवर आणि वारशावर दावा सांगितला आहे, पण येथे अजित पवार व त्यांच्या समर्थकांनी शरद पवार हयात असतानाच आणि त्यांना आपली कृती पसंत नसतानाही त्यांनी पवारांचेच नाव आणि फोटो वापरणे सुरू केले आहे. राजकारणातला हा सर्वात अजब नमुना आहे. पक्षांतर बंदी कायद्याचे झेंगट आपल्या मागे लागू नये किंवा त्यातून आपण सहीसलामत सुटावे यासाठी, आपण फुटलेलोच नाही अशी भूमिका घेऊन आजच्या काळात पक्षांतरे सुरू झाली आहेत. या फुटीला भाजपच्या सरकारी यंत्रणांची मदत आहे, त्यामुळेच त्यांचे हे काम अधिकच सोपे झाले आहे. घटनेच्या दहाव्या परिशिष्टाप्रमाणे पक्षांतर केल्यानंतर आपल्या गटाचे स्वतंत्र अस्तित्व ठेवता येत नाही, या गटाचे दुसऱ्या पक्षात विलीनीकरण करावे लागते. पण त्यालाही फाटा दिला गेला आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मूळ पक्षावर नेमका अधिकार कोणाचा याच्या कायद्यातील तरतुदी स्पष्ट असताना खुद्द निवडणूक आयोगाकडूनच या तरतुदींची पायमल्ली झालेली दिसली आहे. कायद्यात अशी तरतूद आहे की, विधिमंडळातील बहुमतापेक्षा पक्षाच्या यंत्रणेत कोणाचे बहुमत आहे त्याला महत्त्व आहे आणि पक्षाचे चिन्ह आणि नाव पक्षातील बहुमताच्या आधारे ठरते, विधिमंडळ पार्टी किंवा लेजीस्लेचर पार्टीतील बहुमताच्या आधारे ते ठरत नाही, हे स्पष्ट असताना शिवसेनेच्या शिंदे गटाला पक्षाच्या बहुसंख्य आमदारांच्या पाठबळावर शिवसेनेचे नाव आणि निवडणूक चिन्ह दिले गेले आहे. पक्षात पूर्ण वर्चस्व असतानाही ठाकरे गटाला शिवसेना पक्षावरच पाणी सोडण्याची पाळी आली आहे. पक्षांतराच्या विषयाची ही कडी आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचीही वाटचाल त्याच दिशेने सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेसची राष्ट्रीय कार्यकारिणी आणि बहुसंख्य पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्ते शरद पवारांकडे असताना त्या पक्षावर अजित दादांचा गट दावा सांगू लागला आहे. वास्तविक राज्यातील सत्तांतर बेकायदेशीर आहे असे जर न्यायालयाला वाटते आहे तर त्याच सत्तांतराच्या आधारे विधानसभेचा नव्याने अधिकारावर आलेला अध्यक्षही बेकायदेशीर ठरतो; मग त्याच्याकडेच पात्र किंवा अपात्रतेचा निर्णय सोपवण्यात नेमके काय हाशिल आहे, याचीही नेमकेपणाने उकल होऊ शकलेली नाही. त्यामुळे मग न्यायालयीन चौकटीतही पक्षांतराच्या विषयावर तोडगा निघू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

## संपादकीय »

# अर्धवट अर्धवाहक


*फॉक्सकॉन ही जगविख्यात तैवानी कंपनी आणि गेल्या काही दशकांत भारतात झपाट्याने प्रगती व विस्तार केलेला वेदान्त उद्योग समूह यांचा अर्धवाहक म्हणजे सेमी-कंडक्टर*

फॉक्सकॉन ही जगविख्यात तैवानी कंपनी आणि गेल्या काही दशकांत भारतात झपाट्याने प्रगती व विस्तार केलेला वेदान्त उद्योग समूह यांचा अर्धवाहक म्हणजे सेमी-कंडक्टर बनविण्याचा संयुक्त प्रकल्प आधी महाराष्ट्रात होणार होता. गेल्या वर्षी सत्तांतर होऊन एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांनी 'हा प्रकल्प महत्त्वाचा आहे आणि तो महाराष्ट्रात राहील, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू' असे सांगितले होते. प्रत्यक्षात हे सरकार आल्यानंतर चारच महिन्यांनी सप्टेंबरमध्ये हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प गुजरातेत गेला होता. फॉक्सकॉन आणि वेदान्त यांनी या प्रकल्पासाठीची भागीदारी संपल्याचे म्हटले असून फॉक्सकॉन यातून बाहेर पडली आहे. गुजरातमधील प्रस्तावित कंपनी आता केवळ वेदान्तकडे राहिली असून आपण नवीन भागीदार शोधू; मात्र, सेमी-कंडक्टर म्हणजे चिप्स बनविण्याचा संकल्प पुरा केल्याशिवाय राहणार नाही.

**जमिनीखाली जशी खनिजसंपत्ती असते तशीच संपत्ती समुद्राखालीही असते. समुद्रात खोल जाऊन या संपत्तीद्वारे 'ब्ल्यू इकॉनॉमी' समर्थ करण्यासाठी भारतानं सागरी मोहीम आखलीय. समुद्रयान असं या मोहिमेचं नाव असून पुढील वर्षी २०२४ मधे ती पाण्यात उतरेल. या मोहिमेत सहा हजार मीटर खोल समुद्रात जाण्याचा मानस आहे. सहा हजार मीटर म्हणजे जवळपास सात बूर्ज खलिफा बसतील एवढं अंतर!**

# समुद्रयान घेणार 'ब्ल्यू इकॉनॉमी'चा शोध

भारताला एकूण सात हजार ५१७ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. समुद्रकिनाऱ्यावर असलेली नऊ राज्ये आणि लहानमोठी १३८२ बेटे आहेत. या समुद्रात खोलवर सापडणारी खनिजे, वायू अशी नैसर्गिक संसाधने मिळाली तर ही 'ब्लू इकॉनॉमी' देशाच्या अर्थकारणाला नवी ऊर्जा देऊ शकेल. म्हणूनच या संसाधनांच्या शोधासाठी भारतानं मिशन समुद्रयान सुरू केलंय. पुढील वर्षी मार्च महिन्यात या मोहिमेसाठी वापरल्या जाणाऱ्या पाणबुडीची पहिला टप्पा प्रत्यक्षात येणार आहे. नुकताच टायटन या पाणबुडीला झालेल्या अपघातामुळे समुद्राखालील संशोधनक्षेत्राला धक्का बसलाय. त्यामुळे भारताच्या या महात्वाकांक्षी मोहिमेत अशी कोणतीही दुर्घटना घडू नये, म्हणून विशेष काळजी घेण्यात येणार आहे. चेन्नई येथे असलेल्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशन टेक्नॉलॉजी (एनआयओटी) ही



या मोहिमेसाठीची मुख्य संस्था आहे. या मोहिमेसाठी मत्स्य ६००० या नावाची विशेष पाणबुडी विकसित केली असून, यातून तीन तज्ज्ञांची टीम सहा हजार मीटर खोल समुद्रात उतरून संशोधन करेल. पहिल्या टप्प्यात पाचशे मीटरवर आणि दुसऱ्या टप्प्यात सहा हजार मीटर खोलवर ही पाणबुडी उतरणार आहे. पहिल्या टप्प्याची चाचणी पुढील वर्षी २०२४च्या मार्चपर्यंत सुरू येईल. तर दुसरा टप्पा २०२५ मधे प्रत्यक्षात येईल. २०२६ पर्यंत हे संपूर्ण मोहीम फत्ते व्हायला हवी, अशी माहिती नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशन टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. जी. ए. रामदास यांनी माध्यमांना दिली. ही मोहीम यशस्वी झाल्यास अमेरिका, चीन, रशिया, जपान आणि फ्रान्स या बिकसित देशांच्या पंक्तीत भारताला स्थान मिळणार आहे. मत्स्य पालन आणि जलकृषी यासोबतच समुद्रात असलेले विविध उपयुक्त वायू, पॉलिमेटेलिक, मॅंगनीज, हाइड्रोथर्मल सल्फाइड आणि कोबाल्ट क्रस्ट खनिजे शोधण्याचा प्रयत्न याद्वारे होणार आहे. जगाचा ७० टक्के भाग व्यापणारे महासागर आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. आतापर्यंत फक्त पाच टक्केच समुद्र आपल्याला कळलेला असून, उर्वरित ९५ टक्के समुद्र माणसासाठी अज्ञात आहे. भारताला प्रचंड मोठा समुद्रकिनारा लाभलेला असून, देशातील ३० टक्के लोकसंख्या या किनाऱ्यालगत राहते आहे. या किनारपट्टीवर राहणाऱ्या लोकांसाठी मत्स्यपालन, पर्यटन आणि बंदरावरून होणारा व्यापार हे उपजीवीकेची साधने आहेत. देशातील मोठमोठी शहरे किनाऱ्यालगत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ॥१॥

कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।
रुळे माळ कंठीं वैजयंती ॥धृ.॥

मुगुट कुंडले श्रीमुख शोभलें ।
सुखाचें ओतलें सकळ ही ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# खातेवाटपाचा गुंता सुटेना!

## » अजित पवारांचा गट अर्थ, महसूलवर ठाम; पवार दिल्लीला रवाना

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गत काही दिवसांपासून महाराष्ट्रात सुरू असणाऱ्या राजकीय उलथापालथीच्या पार्श्वभूमीवर शिंदे - फडणवीस - पवार सरकारचा बहुप्रतिक्षित मंत्रिमंडळ विस्तार आणखी लांबण्याची शक्यता आहे. हा विस्तार बुधवारी सायंकाळी होण्याची शक्यता होती. पण अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचा गट काही महत्त्वाच्या खात्यांसाठी अडून बसला आहे.**


त्यामुळे शिंदे - फडणीसांची मोठी गोची झाली आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार बुधवारी सायंकाळी तातडीने दिल्लीला रवाना झाले. शिंदे व फडणवीसही



लवकरच दिल्ली गाठणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रथम मंत्रिमंडळ विस्तार करा आणि नंतर योग्यवेळी खातेवाटप करु, असा पवित्रा घेतला होता. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतर खातेवाटपाची चर्चा सुरु झाली होती. त्यानुसार मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांत मॅरेथॉन बैठका झाल्या. पण खातेवाटपाचा तिढा अद्याप सुटला नाही.अजित पवार यांचा गट महसूल, अर्थ व जलसंपदा या 3 खात्यांसाठी अडून बसला आहे. महसूल खाते सध्या राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे आहे. तर अर्थ व जलसंपदा ही दोन्ही खाती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहेत. शिंदे गटाच्या आमदारांचा अजित पवारांना अर्थखाते देण्यास ठाम विरोध आहे. या आमदारांनी एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात बंड करताना तत्कालीन अर्थमंत्री अजित पवारांवर निधीवाटपात भेदभाव करत असल्याचा आरोप केला होता. आता पुन्हा हे खाते अजित पवारांकडे गेल्यास ते पूर्वीसारखाच व्यवहार करू शकतात, असा शिंदे गटाचा युक्तिवाद आहे.गत काही दिवसांत सातत्याने बैठका होऊनही खातेवाटपाचा तिढा सुटला नाही. त्यामुळे आता हा वाद दिल्लीत भाजपश्रेष्ठींच्या दरबारात सुटण्याची शक्यता आहे. त्यासाठी अजित पवार बुधवारी सायंकाळी दिल्लीला रवाना झाले. त्यांच्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही दिल्लीला जाणार आहेत.

ते तिथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करून या मुद्यावर तोडगा काढतील, असा अंदाज आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीर गटाच्या शपथविधीची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ऐनवेळी देण्यात आली असावी. त्यामुळेच आमच्या शपथविधीचा विचार झाला नसावा, असा धक्कादायक दावा प्रहार संघटनेचे नेते आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. राज्यातील तीन इंजिनाचे सरकार मजबूत आहे. पण ते केव्हाही कोसळू शकते, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. अजित पवार व त्यांच्या समर्थकांच्या सरकारमधील समावेशापासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापुढील समस्यांत कमालीची वाढ झाली आहे. राष्ट्रवादीच्या सरकारमधील समावेशामुळे शिंदेंच्या गोटातील आमदारांत अस्वस्थता निर्माण झाली आहे. तसेच भाजपचेही काही आमदार नाराज झालेत. या पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांनी वरील शब्दांत आपल्या मनातील खदखद व्यक्त केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांच्या शपथविधीची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याना अगोदर देण्यात आली नसावी. त्यांना ते ऐनवेळी सांगण्यात आले असावे. त्यामुळे आमच्या शपथविधीचा वेळीच विचार झाला नसेल, असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

### राजा बनला सुभेदार



» मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतरही अद्याप अजित पवारांसह त्यांच्या गटातील मंत्र्यांना खाते मिळालेले नाही. या पार्श्वभूमीवर ते आज (१२ जुलै) दिल्लीला गेले. हाच मुद्दा पकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचं उदाहरण देत अजित पवारांना टोला लगावला.

---

# माथाडीच्या नावाखाली लूटणारी टोळी अटकेत

। पिंपरी ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

माथाडीच्या नावाखाली लूटमार करणाऱ्या टोळीला वाकड पोलिसांनी अटक केली आहे. रमाकांत ऊर्फ बबलू राजेंद्र जोगदंड (वय ३०, रा. वाकड), समीर ऊर्फ बबलू नझीर शेख (वय ३३, रा. काळेवाडी), मयूर बाळासाहेब सरोदे (वय २३) आणि करण सदाफळ चव्हाण (वय २४, दोघेही रा. पुनावळे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत अनिकेत रवींद्र वाडिया (वय २४, रा. शिवाजीनगर, पुणे) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.आरोपी जोगदंड आणि त्यांच्या साथीदारांनी माथाडी कामगार संघटनेचा अध्यक्ष असून, माझ्या परवानगीशिवाय येथे कामगार कसे ठेवले, कसे काम करत आहात असे म्हणत फिर्यादी अनिकेत याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. घड्याळ, अंगठी जबदरस्तीने काढून नेली.

आरोपी जोगदंड, शेख हे दोघे वाशी येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून त्यांना अटक केले. आरोपी जोगदंड हा सराईत असून, माथाडी ट्रान्सपोर्ट सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियनचा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष आहे. दुसऱ्या एका कारवाईत सुरेश बाबूराव बनसोडे (वय ३७, रा. रहाटणी) याला अटक केली आहे. त्याने दहा हजारांची खंडणी मागत ट्रकची काच फोडली होती. तो माथाडी जनरल कामगार युनियन ट्रान्सपोर्टचा पिंपरी-चिंचवड सचिव असल्याचे सांगत लूटमार करत होता.

# कृषीमंत्र्यानी दिली खोटी माहिती

## » देवेंद्र फडणवीस यांचा ठाकरेंवर पलटवार

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी 2014 आणि 2019 च्या विधानसभा निवडणुकीत निवडणूक आयोगाला संपत्तीबाबत खोटी माहिती दिल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी सिल्लोड येथील सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपल्ली यांनी 2021मध्ये याचिका दाखल केली होती. याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी तपास केला. तेव्हा ही माहिती समोर आली.**



एकीकडे मंत्रिमंडळ विस्तार आणि मंत्र्यांच्या आदलाबदलीची माहिती समोर येत असतानाचा सत्तार यांचे हे नवे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणाची माहिती आज (12 जुलै) समोर आली आहे. दरम्यान, याबाबत महाइन्यूज डिजिटलने मंत्री अब्दुल सत्तार यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.सिल्लोड न्यायालयात महेश शंकरपल्ली यांनी याचिका दाखल केली आहे. त्यात अब्दुल सत्तार यांनी 2014 आणि 2019 मध्ये निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात शेत जमीन, व्यावसायिक इमारती, निवासी इमारती, शिक्षण आणि जमिनीबद्दल खोटी माहिती दिल्याचे म्हटले होते. या प्रकरणी कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार पोलिसांनी दोनदा तपास सुरू केला. मात्र, त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला. तिसऱ्यावेळी पोलिसांनी अब्दुल सत्तार यांचा जबाब घेतला. तेव्हा निवडणूक शपथपत्रात नमूद केलेली माहिती आणि या जबाबात तफावत आढली असल्याचे महेश शंकरपल्ली यांच्या वकिलाने सांगितले.अब्दुल सत्तार यांनी सन 2014 व 2019 मध्ये विधानसभा निवडणुकीकरिता दिलेल्या नामनिर्देशन पत्रामध्ये / शपथपत्रामध्ये / प्रतिज्ञापत्रामध्ये शेतजमिनीच्या तपशीलात तफावत आढळून येते. 2019 मधील प्रतिज्ञापत्रानुसार मौजे दहिगाव सर्व्हे नंबर 31, 131, 35, 39,29 ही शेतजमीन त्यांनी रु. 2,06,250/- रूपयात खरेदी केल्याचे दाखवले आहे.

# कलम 370 वर सर्वोच्च सुनावणी

## » कलम 370 मुळे राज्यातील सुरक्षा आणि स्थिरता धोक्यात

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू आणि काश्मीरला विशेष अधिकार देणार कलम ३७० हटविले. या निर्णयाच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायायात दाखल झाल्या होत्या. या सर्व याचिकांची सर्वोच्च न्यायालयात आता एकत्रितपणे २ ऑगस्टपासून सुनावणी घेण्यात येणार आहे. सोमवारी (१० जुलै) केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करून सांगितले की, २०१९ साली घेतलेल्या निर्णयामुळे या भागात अभूतपूर्व असा विकास झाला झाला आहे.**

कलम ३७० असताना राज्यातील सुरक्षा आणि स्थिरता धोक्यात होती. त्यामुळेच संसदेने सावधपणे पावले टाकत एक चांगला निर्णय घेतला. जम्मू आणि काश्मीरमधील पिपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांनी मंगळवारी (दि. ११ जुलै) भीती व्यक्त केली.

त्या म्हणाल्या, चार वर्षांपासून मौन बाळगल्यानंतर या विषयावरील याचिकांची सुनावणी घेण्याचा निर्णय आताच का घेण्यात आला. नुकताच काश्मीर दौरा केल्यानंतर त्यांनी (सर्वोच्च न्यायालय) कलम ३७० बाबत एवढ्या तत्परतेने सुनावणी हाती घेतल्यामुळे याबद्दल कायदेशीर शंका निर्माण होत आहे. चार वर्ष मौन धारण केल्यानंतर आता रोज या प्रकरणावर सुनावणी घेण्याचा निर्णय गैरसमज निर्माण करणारा आहे.कलम ३७० रद्द केल्यानंतर विरोधी पक्षांनी भिन्न भिन्न प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या. सुरुवातीला काँग्रेसने या निर्णयाचा निषेध नोंदविला, मात्र त्यानंतर सावध पवित्रा घेऊन आपल्या भूमिकेत बदल केला. भाजपाला मात्र या निर्णयासाठी अनेक राजकीय पक्षांचा पाठिंबा मिळाला.




### कलम 370 पुन्हा लागू करू : जनता दल

मात्र त्यात कुठेही कलम ३७० पुन्हा लागू करू, याचा उल्लेख केला नाही. ५ ऑगस्ट २०१९ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी कलम ३० हटविण्याची घोषणा करताच भाजपाचा कधी काळी सहकारी असलेल्या जनता दल (यूनायटेड) पक्षाच्या खासदारांनी सभात्याग करून निषेध व्यक्त केला होता. “आमचे नेते नितीश कुमार हे जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया आणि जॉर्ज फर्नांडिज यांची परंपरा पुढे नेत आहेत.

त्यात बहुजन समाज पक्ष, आम आदमी पक्ष, नवीन पटनायक यांचा बिजू जनता दल, जगनमोहन रेड्डी यांचा वायएसआर काँग्रेस पक्ष, भारत राष्ट्र समिती आणि तेलगू देसम पार्टीने या निर्णयाचे समर्थन केले आहे.दरम्यान काश्मीरमधील राजकीय पक्ष नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी आणि पिपल्स कॉन्फरन्स या पक्षांनी कलम ३७० हटविण्याच्या निर्णयाचा पदोपदी निषेध केला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा एकमेव राष्ट्रीय पक्ष आहे, ज्यांनी या निर्णयाला सुरुवाती पासून विरोध दर्शविला होता. या विषयावर काँग्रेसची द्विधा मनस्थिती दिसून आली. काँग्रेसने संसदेत केंद्र सरकारच्या निर्णयाचा विरोध केला. मात्र नंतर त्यांच्या भूमिकेत बदल झाला. कदाचित लोकांची भावना पाहून काँग्रेसच्या नेत्यांच्या धारणा बदलल्या, असे म्हटले जाते. ६ ऑगस्ट २०१९ रोजी काँग्रेस कार्यकारिणीने केंद्र सरकारवर टीका करून कलम ३७० रद्द करण्याबाबत नाराजी व्यक्त केली.

काँग्रेसने नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी आणि पिपल्स कॉन्फरन्स यांच्यासह गुपकार आघाडीत समावेश करत ऑगस्ट २०२० रोजी एक संयुक्त निवेदन दिले. जम्मू आणि काश्मीरमधील कलम ३७० आणि ३५अ रद्द करण्यासंदर्भात ठराव केला. ५ ऑगस्ट २०१९ रोजी झालेल्या गुपकार जाहीरनाम्याचा काँग्रेसही एक भाग होता. मात्र नोव्हेंबर २०२० साली काँग्रेसने जाहीर केले की, ते गुपकार आघाडीत नाहीत. २९ जानेवारी २०२३ रोजी राहुल गांधी यांनी राष्ट्रव्यापी भारत जोडो यात्रेचा समारोप श्रीनगर येथे केला.

यावेळी राष्ट्रध्वज फडकवून त्यांनी भाषण केले, मात्र त्यात कुठेही कलम ३७० पुन्हा लागू करण्याबाबत भाष्य केले नाही. यावरून या विषयाशी ते स्वतःला बांधून घेऊ इच्छित नाही, हे दिसून आले. दुसऱ्याच महिन्यात छत्तीसगडमधील रायपूर येथे काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. काँग्रेस जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्यासाठी आणि लडाखला घटनेच्या सहाव्या अनुसूचीच्या संरक्षणाखाली आणण्याचा प्रयत्न करेल, असे अधिवेशनातील ठरावाच्या मसुद्यात म्हटले.

---

# 4 दहशतवाद्यांना 10 वर्षे कैद

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीच्या एनआयए कोर्टाने इंडियन मुजाहिद्दीनचे 4 दहशतवादी दानिश अन्सारी, आफताब आलम, इम्रान खान आणि ओबेद उर रहमान यांना 10 वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे.**

एनआयए कोर्टाने त्यांना भारताविरुद्ध कट रचल्याबद्दल दोषी ठरवले. चौघेही आयपीसीच्या विविध कलमांखाली तसेच बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा (यूएपीए) अंतर्गत दोषी आढळले. आरोपींनी 7 जुलै रोजी गुन्हा कबूल केल्याचे लक्षात घेऊन न्यायालयाने हा आदेश दिला. एनआयएने सप्टेंबर 2012 मध्ये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. चारही दोषी इंडियन मुजाहिद्दीनशी संबंधित आहेत. या संघटनेवर भारताच्या विविध भागात दहशतवादी घटनांचा कट रचल्याचा आरोप आहे.दोषींनी भारताच्या विविध भागात विशेषतः दिल्लीत गुन्हेगारी कट, बॉम्बस्फोट आणि दहशतवादी कारवायांसाठी मोठ्या प्रमाणावर नवीन सदस्यांची भरती केली. दोषी मुस्लिम तरुणांना बाबरी मशीद विध्वंस, गुजरात दंगल आणि मुस्लिमांवरील इतर कथित घटनांबद्दल सांगायचे आणि त्यांना दहशतवादी कारवायांमध्ये भरती करण्याच्या प्रयत्नात त्यांचे मन कट्टरपंथी बनवायचे. या चौघांवर भारत सरकारविरुद्ध युद्ध पुकारण्याचा कट रचणे, युद्ध पुकारण्याची योजना लपवणे आदी कलमे लावण्यात आली.

---

# बागेश्वरच्या कार्यक्रमात चेंगराचेंगरी

## » उष्णतेमुळे अनेकजण बेशुद्ध ; 10 जण जखमी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बागेश्वर येथील बाबा पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या ग्रेटर नोएडातील दरबारात बुधवारी गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली. उष्णता आणि आर्द्रतेमुळे अनेकजण बेशुद्ध झाले. तसेच 10 जण गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे.**

दरम्यान, एका महिलेला विजेचा धक्का बसला. व्हीआयपी पासच्या मागे असलेल्या एका छोट्या गेटमधून प्रवेश केला जात होता, तिथे विजेच्या तारांना स्पर्श झाल्याने एका महिलेला विजेचा धक्का बसला.चेंगराचेंगरीत लहान मुले, वृद्ध आणि महिला बहुतांश जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. काही महिलांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. एका महिलेच्या डोळ्यावर जखम झाली आहे. जखमींना तीन रुग्णवाहिकांमधून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बाबांच्या दैवी दरबारात आयोजकांनी लावलेले तिन्ही पंडाल पूर्णपणे भरले होते. पंडालबाहेरही भाविकांची गर्दी होती. बाबांच्या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात व्हीव्हीआयपी पास देण्यात आले होते. मात्र गर्दी पाहता व्हीआयपी प्रवेश आधीच बंद करण्यात आला होता. दुपारी 12 वाजेपूर्वीच पाच लाखांहून अधिक लोक दरबारात पोहोचले होते. त्यानंतरही भाविकांची दरबारात ये जा सुरूच होती. धीरेंद्र शास्त्री यांची एक झलक पाहण्यासाठी घटनास्थळी परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. परिस्थिती पाहून पोलिसांनी भाविकांना भाविकांना घरी जाण्याची विनंती केली. लोकांना घरोघरी प्रवचन ऐकण्यास सांगण्यात आले.तत्पूर्वी, दैवी दरबारात पंडित धीरेंद्र शास्त्री म्हणाले - भारतातील सर्व हली-उल्लाह करणाऱ्यांनो ऐका. आता तुमचे हे फुंकणे आणि फेकण्याचे चमत्कार थांबतील. आम्ही तुमची ठठरी बांधणार आहोत.



### शाश्वत शक्तीपेक्षा मोठी शक्ती नाही

हिम्मत असेल तर केव्हाही या, आम्ही तुमच्याबद्दल एवढे सांगू की तुम्ही तुमच्या बायकोलाही तोंड दाखवू शकणार नाही. जे फुंकून ढोंगीपणा करतात त्यांनी हे सर्व थांबवावे. शाश्वत शक्तीपेक्षा मोठी शक्ती नाही. जे लोक याला अंधश्रद्धा मानतात आणि देव नाही असे म्हणतात, त्या लोकांना माझे खुले आव्हान आहे, त्यांनी कधीही येऊन बोलावे, मी त्यांचा पूर्ण पर्दाफाश करेन.

# थलपथी विजय राजकारणात येणार ?

दाक्षिणात्य सुपरस्टार थलपथी विजय नुकताच (विजय मक्कल इयक्कम) च्या सदस्यांना भेटला. त्यामुळे त्याच्या राजकीय पदार्पणाची चर्चा सुरू झाली आहे. राजकीय प्रवेशापूर्वी विजय तमिळनाडूमध्ये पदयात्रा काढणार असल्याचे आता ऐकायला मिळत आहे. इतकंच नाही, तर अशी बातमी आहे की, राजकीय प्रवेशानंतर विजय चित्रपटसृष्टीतून ब्रेक घेऊ शकतो. विजयचा पुढचा चित्रपट 'लिओ' आहे जो या वर्षी 19 ऑक्टोबरला रिलीज होणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, 'लिओ' रिलीज होण्यापूर्वी विजय तमिळनाडूत पदयात्रा काढणार आहे. मात्र, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. यापूर्वी जूनमध्येही, विजयने तामिळनाडूमधील सर्व 234 मतदारसंघातून 10वी आणि 12वीच्या टॉपर्ससाठी सुविधा उपलब्ध



केली होती. तेव्हापासून त्याच्या राजकीय पदार्पणाची शक्यता व्यक्त केली जात आहे. वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, विजय सध्या 'लिओ'च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. विजय व्यतिरिक्त या चित्रपटात संजय दत्त आणि त्रिशा देखील दिसणार आहेत. शाहरुख खान स्टारर 'जवान' या चित्रपटातही तो छोट्या भूमिकेत दिसणार आहे. यानंतर तो नोव्हेंबरमध्ये दिग्दर्शक व्यंकट प्रभू यांच्या शीर्षक नसलेल्या चित्रपटावर काम करण्यास सुरुवात करणार आहे. या प्रकल्पानंतर तो पूर्णवेळ राजकारणात येऊ शकतो.काही रिपोर्ट्समध्ये असेही म्हटले आहे की विजय आपल्या राजकीय कारकिर्दीसाठी चित्रपटांमधून 3 वर्षांचा ब्रेक घेऊ शकतो. यापूर्वी, इंडिया टुडे मधील एका अहवालात असे म्हटले आहे की विजय 2024 मध्ये स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन करू शकतो आणि 2026 च्या निवडणुकीतही सहभागी होऊ शकतो.

# पासपोर्टशिवाय विमानतळावर पोहोचली मौनी रॉय

बॉलिवूड अभिनेत्री मौनी रॉय बुधवारी सकाळी मुंबईच्या विमानतळावर दिसली. विमानतळाच्या प्रवेशद्वारावर पोहोचल्यावर मौनीला आठवले की, ती तिचा पासपोर्ट घरीच विसरली आहे. यानंतर ती बराच वेळ अस्वस्थ दिसली. सोशल मीडियावर समोर आलेल्या एका व्हिडिओमध्ये मौनी एअरपोर्टवर ब्लू आणि व्हाइट आउटफिटमध्ये प्रवेशद्वारावर थांबलेली दिसली. तपासणीत पासपोर्ट मागितला असता तिने तो पर्समध्ये शोधण्यास सुरुवात केली. बराच वेळ पर्समध्ये पासपोर्ट शोधल्यानंतर ती मागे वळली आणि पापाराझीला पाहून म्हणाली- 'झाले... पासपोर्ट विसरला...' यानंतरही मौनी बराच वेळ तिच्या पर्समध्ये पासपोर्ट शोधत राहिली, नंतर ती कॉलवर कोणाशी तरी बोलताना दिसली.त्याचवेळी हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर यूजर्सने मौनीला ट्रोल करण्यास सुरुवात केली. एका यूजरने लिहिले की, 'पापाराझींना कॉल करताना तुम्ही पासपोर्ट विसरला असाल.' तर दुसऱ्याने कमेंट केली, 'कितना क्या क्या याद रखे बेचारी... मेकअप, हेयरड्रेस, बैग या फिर पार्सपोर्ट और इम्पॉर्टेंट पेपर्स'मौनी सध्या तिचा आगामी चित्रपट 'द व्हर्जिन ट्री'चे शूटिंग करत आहे. अलीकडेच ती 'डान्स बांगला डान्स 12' या रिॲलिटी शोमध्ये जज म्हणून दिसली होती.

# तमन्नाने विमानतळावर केला डान्स



अलीकडेच तमन्ना भाटियाच्या आगामी 'जेलर' या चित्रपटातील 'कावाला' हे गाणे रिलीज झाले, जे सोशल मीडियावर खूप ट्रेंड करत आहे. या गाण्यात अभिनेत्री सुपरस्टार रजनीकांतसोबत डान्स करताना दिसत दरम्यान, तमन्ना नुकतीच मुंबई विमानतळावर पापाराझीसोबत 'कावाला' गाण्यावर नाचताना दिसली होती, ज्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे.व्हिडिओमध्ये तमन्ना कारमधून उतरताना दिसत आहे. तिने मॅचिंग ब्लॅक टॉपसह काळी पँट घातली आहे. ती टर्मिनल गेटच्या दिशेने सरकताच तेथे उपस्थित असलेल्या पापाराझींनी तिला त्यांच्यासोबत नाचण्यास सांगितले. अभिनेत्रीने त्यांना नाउमेद केले नाही आणि तिच्या 'कावाला' गाण्यावर मीडिया व्यक्तीसोबत नाचण्यास सुरुवात केली. दोघेही गाण्याचे हुक स्टेप करताना दिसले. यानंतर तमन्नानेही त्या व्यक्तीला मिठी मारली.व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, मला त्या आवडतात. ती खूप आनंदी आणि मजेदार मुलगी दिसते'. आणखी एका यूजरने लिहिले की, 'तमन्ना खूप नम्र आणि सुंदर आहे'. तर तिसऱ्या यूजरने असे लिहिले. तमन्ना भाटिया रजनीकांतसोबत जेलर या चित्रपटात दिसणार आहे. यावर आनंद व्यक्त करताना तमन्नाने एएनआय या वृत्तसंस्थेला सांगितले होते की, 'रजनीकांतसोबत काम करणे हे स्वप्न पूर्ण होण्यासारखे आहे. जेलर सेटवर घालवलेल्या आठवणी मी नेहमी जपत राहीन. त्यांनी मला अध्यात्मिक प्रवासाचे पुस्तक भेट दिले.



## सुनील शेट्टी त्रस्त

सध्या टमाट्यांचे भाव गगनाला भिडले आहेत. सध्या सर्वसामान्यांच्या ताटातून टमाटे पूर्णपणे गायब झाले आहेत. मात्र, सर्वसामान्यांशिवाय सेलिब्रिटींनाही याचा त्रास होत आहे. सुनील शेट्टी म्हणाला की, रेस्टॉरंट मालक असल्याने त्यालाही चवीशी तडजोड करावी लागत आहे.

आजकाल तो टमाटे कमी खात असल्याचे सुनीलने सांगितले. सुनीलच्या म्हणण्यानुसार, लोकांना वाटते की तो इतका मोठा सुपरस्टार आहे तर या गोष्टींचा त्याच्यावर काहीही परिणाम होणार नाही. मात्र तसे नाही, त्यालाही वाढलेल्या किंमतींना सामोरे जावे

## राशाची स्माइली पोज



रवीना टंडनची मुलगी राशा थडानी लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. अलीकडेच ती मुंबईतील एका सलूनबाहेर स्पॉट झाली. ज्याचा एक व्हिडिओ समोर आला आहे. व्हिडिओमध्ये राशा खूपच स्टायलिश लूकमध्ये दिसली. या व्हिडिओमध्ये राशा ब्लॅक अँड व्हाइट कलरच्या आउटफिटमध्ये खूपच सुंदर दिसत आहे. तिने काळ्या रंगाचे लेदर जॅकेट आणि पांढऱ्या टी-शर्टसोबत मॅचिंग पॅन्ट घातली आहे. राशाने हसत हसत पापाराझींना पोजही दिली. व्हिडिओ समोर येताच चाहते राशाची तुलना अभिनेत्री तारा सुतारियासोबत करत आहेत. व्हिडीओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'राशा अगदी ताराचीच फोटो कॉपी असल्याचे दिसते आहे. दुसऱ्या युजरने राशाचे कौतुक करत लिहिले, 'ती खूप सुंदर आहे आणि अभिनेत्री होण्यास पात्र आहे'. तर त्याच तिसऱ्याने लिहिलं, 'ये तारा सुतारिया लगती है '.राशा थडानीने नुकतेच मुंबईतील धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलमधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले.

# ब्रिजभूषणविरोधात गुन्हा दाखल!

## » ब्रिजभूषण याच्यावर गुन्हा दाखल; कुस्तीपटूंचे आंदोलन स्थगित

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी भारतीय कुस्ती महासंघाचे (डब्ल्यूएफआय) अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी १५ जणांचा जबाब नोंदवल्यानंतर हे आरोपपत्र निश्चित केले. यावेळी पोलिसांनी तांत्रिक पुरावे म्हणून काही फोटोही ताब्यात घेतले आहेत. त्यामुळे आता कारवाईला वेग येण्याची शक्यता आहे.**



महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केल्याचा आरोप ब्रिजभूषण सिंह यांच्याविरोधात करण्यात आला आहे. परंतु, त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येत नव्हती. त्यामुळे भारतातील अग्रगण्य कुस्तीपटूंनी जंतर मंतरवर आंदोलन पुकारले होते. ब्रिजभूषण सिंह यांच्याविरोधात गुन्हा दाखल होऊन कारवाई होत नाही तोवर आंदोलन थांबवणार नसल्याचं कुस्तीपटूंनी ठरवलं होतं. अखेर ब्रिजभूषण यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर कुस्तीपटूंनी आंदोलन स्थगित केलं. आता ब्रिजभूषण यांच्याविरोधात आरोपपत्रही दाखल करण्यात आलं आहे.

लैंगिक छळ, विनयभंग आणि पाठलाग आदी गुन्ह्यांबाबत त्यांना शिक्षा ठोठावली जाऊ शकते, असे दिल्ली पोलिसांच्या आरोपपत्रात नमूद केले आहे.

१३ जून रोजीच्या या आरोपपत्रात ब्रिजभूषण यांच्याविरुद्ध भारतीय दंडसंहितेच्या कलम ५०६ (गुन्हेगारी धमकी), ३५४ (महिला विनयभंग); ३५४ अ (लैंगिक छळ) आणि ३५४ ड (पाठलाग) लागू करण्यात आले आहे. एका प्रकरणात ब्रिजभूषण यांनी संबंधिताचा वारंवार छळ केल्याचे तपासात निदर्शनास आले आहे.

सहापैकी दोन प्रकरणांत ब्रिजभूषण यांच्यावर 'कलम ३५४, ३५४ अ आणि ३५४ ड'अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर चार प्रकरणांत 'कलम ३५४' आणि '३५४ अ'अंतर्गत आहेत. त्यानुसार पाच वर्षांपर्यंत कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे.भारतीय कुस्ती महासंघाच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांना चार फोटो पुरवले आहेत.

### पोलीस तपासात विरोधाभास

यंदा फेब्रुवारीच्या प्रारंभी कुस्तीपटूंनी ब्रिजभूषण सिंग यांच्याविरुद्ध जाहीर आरोप केले होते. या संदर्भात जागतिक अजिंक्यपद विजेत्या मुष्टियोद्ध्या मेरी कोम यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या चौकशीदरम्यानही या कुस्तीपटूंनी हे आरोप केले होते. मात्र, एकीकडे ब्रिजभूषण यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना शिक्षा व्हावी, इतपत गंभीर आरोप असल्याचे दिल्ली पोलिसांचे म्हणणे आहे. मात्र, दुसरीकडे चौकशी समितीसमोरही हेच आरोप करण्यात आले असताना या समितीने याबाबत गंभीर दखल घेऊन पोलीस कारवाईची शिफारस क्रीडा मंत्रालयाला दिलेल्या अहवालात केली नव्हती.



# 'बोलर्सची लाईन नाही लागली...' द्रविडसोबत वेटरने घातला वाद

| मुंबई |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**वेस्ट इंडिज दौऱ्यावर कसोटी मालिका खेळण्यासाठी गेलेल्या भारतीय संघात अनुभवी वेगवान गोलंदाज म्हणून केवळ मोहम्मद सिराजच्या नावाचा समावेश आहे. याशिवाय संघातील अन्य वेगवान गोलंदाजांमध्ये जयदेव उनाडकट, नवदीप सैनी आणि मुकेश कुमार यांचा समावेश आहे. अष्टपैलू शार्दुल ठाकूरही आहे. यापैकी कुणालाही वेस्ट इंडिजमध्ये कसोटी फॉरमॅटमध्ये खेळण्याचा अनुभव नाही.**

यावर कर्णधार रोहित शर्माला विचारले असता, वेगवान गोलंदाजांबाबतची त्याची व्यथा सर्वांसमोर आली. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी पत्रकार परिषदेत भारतीय कर्णधार रोहित शर्माला जेव्हा अननुभवी वेगवान गोलंदाजीबद्दल प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्याने उत्तर दिले की, "येथे वेगवान गोलंदाजांनी भरपूर विकेट्स घेतल्याचे आम्ही पाहिले आहे, पण आता जे संघात आहेत तेचं आहेत. खेळाडूंना दुखापत झाल्यावर असे निर्णय घ्यावे लागतात."रोहित पुढे म्हणाला की, "यावेळी आमचे अनेक गोलंदाज जखमी आहेत. म्हणूनच सध्या आपल्याकडे असलेले निवडक गोलंदाजांना घेऊन रोटेशननुसार खेळवावे लागेल. कर्णधार रोहित शर्मा दुखापतग्रस्त गोलंदाजांच्या बाबतीत म्हणाला की, " जसप्रीत बुमराहसारखा खेळाडू अजूनही त्याच्या दुखापतीतून सावरतो आहे. त्यामुळे तो विश्वचषकापर्यंत तंदुरुस्त होणे खूप महत्वाचे आहे.

## » अश्विनने केली वेटर , बारटेंडरशी एक तास चर्चा

| नवी दिल्ली |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**ॲशेस २०२३ मालिकेतील दुसरा कसोटी सामना लॉर्ड्स इथे खेळला गेला. या सामन्यातील दुसऱ्या डावात जॉनी बेअरस्टोलाॲलेक्स कॅरीने रनआऊट केले, तेव्हा जागतिक क्रिकेटमध्ये एक नवा वाद निर्माण झाला होता. बेअरस्टोच्या रनआऊटनंतर काहींनी ऑस्ट्रेलियन संघाच्या खिलाडूवृत्तीवर प्रश्न उपस्थित केले. त्याचवेळी, काहींनी हे योग्य असल्याचे सांगताना बेअरस्टोने लवकर क्रीज सोडणे ही चूक असल्याचे म्हटले.**

आता अश्विनने मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्याशी या रनआऊटबाबत वेस्ट इंडिजमधील बारटेंडर आणि वेटरसोबत झालेल्या वादाचा खुलासा केला आहे. रविचंद्रन अश्विनने त्याच्या यूट्यूब चॅनलवर सांगितले की, आम्ही समुद्र किनाऱ्यावर बसलो होतो आणि त्याचवेळी राहुल भाई माझ्यासाठी लिंबाचा रस घेऊन तिथे आला. त्याने सांगितले की, बेअरस्टोच्या आऊटबाबत त्याने वेटर आणि बारटेंडरशी एक तास चर्चा केली. या वेळी नियम आणि खिलाडूवृत्तीसह प्रत्येक बाबींवर चर्चा झाली. ते सगळे खूप भावूकही झाले होते. दरम्यान, तिथे बसलेल्या एका वृद्ध व्यक्ती म्हणाला बेअरस्टो आऊट होता. जॉनी बेअरस्टोच्या या विकेटबद्दल सांगायचे तर, कांगारू यष्टिरक्षक ॲलेक्स कॅरीचा चेंडू विकेटवर लागला, तेव्हा तो क्रीझच्या बाहेर होता. शॉर्ट पिच बॉल सोडल्यानंतर आऊट झालेल्या बेअरस्टोला वाटले की बॉल डेड झाला आहे. याबाबत इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचे अनेक माजी खेळाडूही क्रिकेट विश्वात आपापल्या संघाच्या बाजूने वक्तव्य करताना दिसले.रविचंद्रन अश्विन म्हणाला,"आम्ही सगळे इथे जेवायला गेलो होतो. मी, दिलीप सर, राहुल द्रविड, विक्रम राठोड, आम्ही सगळे. त्यावेळी आम्ही एका रेस्टॉरंटजवळून गेलो. एक म्हातारा माणूस आला आणि त्याने कॅरिबियन उच्चारात आम्हाला विचारले, 'तुम्हाला पेय आवडेल का? मग अचानक तो आम्हा सगळ्यांना ओळखू लागला आणि अतिशय उत्साहाने म्हणाला, 'मी तुम्हाला ओळखतो. आपण कोणासारखे तरी दिसत आहात. तुम्ही क्रिकेटपटूसारखे दिसत आहात. तुम्ही अश्विन आहात. तुम्ही राहुल द्रविड आहात."



अश्विनच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे – रविचंद्रन अश्विन यावेळी वेस्ट इंडिज दौऱ्यावर दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळण्यासाठी सज्ज आहे. या कसोटी मालिकेत अश्विनने आणखी तीन विकेट्स घेतल्यास, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७०० विकेट्स पूर्ण करणारा तो तिसरा भारतीय गोलंदाज ठरणार आहे.